# ज्योतिष विषयाचं भविष्य काय असेल !

– डॉ. जयंत नारळीकर

**ज्योतिष हे शास्त्र नाही असं अनेक शास्त्रज्ञ, साधार मांडत आले आहेत आणि तरी ज्योतिषावर विश्वास ठेवत जगणाऱ्यांची संख्याही दुर्लक्ष करता येण्यासारखी नाही. म्हणूनच ज्योतिषशास्त्र मानणाऱ्या आणि न मानणाऱ्यांना 'साऱ्याजणी'नी लिहितं करणारं आवाहन केलं होतं. वाचकांकडून एकूण २७ प्रतिक्रिया आल्या. त्यापैकी ज्योतिषावर विश्वास ठेवत अनुभव सांगणाऱ्या १६ आणि ज्योतिष शास्त्रावर विश्वास नाही असं प्रतिपादन करणाऱ्या ११ प्रतिक्रिया आहेत. त्यातल्या संपादकमंडळानी पाठवलेल्या निवडक प्रतिक्रियांचा परामर्ष डॉ. जयंत नारळीकरांनी घेतला आहे. आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून एवढा मोठा शास्त्रज्ञ काही मांडणी करतो तेव्हा त्यांची मांडणी वाचकांना विचार करायला लावेल असं मन:पूर्वक वाटतं.**

फलज्योतिषावर मत प्रदर्शन करणारी पत्रे वाचली.

फलज्योतिषावर विश्वास ठेवणारी १६, तर त्याला अंधविश्वास मानणारी ११ पत्रे होती. त्यापैकी पहिल्या प्रकारच्या पत्रांत एका दोघांनी अशी शंका व्यक्त केली होती 'जयंत नारळीकरांचे' फलज्योतिषाविरुद्धचे मत प्रसिद्ध आहे. तेव्हा ते आपला पत्रांवरील अभिप्राय निरपेक्षपणे देतील का?' ह्या संबंधात मला इतकेच सांगायचे आहे की ह्या वादावर मी केवळ वस्तुनिष्ठ विधाने करीन. तसेच फलज्योतिषावर अविश्वास ठेवणारी मंडळी केवळ 'जयंत नारळीकर असे म्हणतात म्हणून आम्ही फलज्योतिषावर विश्वास ठेवत नाही.' असे म्हणत असतील तर त्यांनीही आत्मपरीक्षण करून तथ्याधारित भूमिका घ्यावी.

पण फलज्योतिषावर बहिष्कार टाकणारी पत्रे पाहून त्यांत वरील प्रकारचे विधान नव्हते हे नमूद करावेसे वाटते. त्यातील विधाने साधारणपणे अशा प्रकारची होती.

१) फलज्योतिषाचा पायाच अनिश्चित, गुळमुळीत स्वरूपाचा आहे.
२) माणसाने आपल्या कर्तृत्वावर जोर देऊन स्वत:चे भवितव्य स्वत: ठरवावे. फलज्योतिष स्वत:वरची जबाबदारी ग्रहांवर टाकायला शिकवते.
३) स्वत:ला फलज्योतिषातील भविष्याचे अनुभव- भविष्य गुळमुळीत भाषेत होते, लागू पडले नाही अशा प्रकारचे होते.
४) हा विषय विज्ञानाची शिस्त पाळत नाही, वैज्ञानिक दृष्टिकोनाशी विसंगत आहे.
५) ज्योतिष विषय विद्यापीठांत शिकवण्यापेक्षा त्याचा खरेखोटेपणा तपासला जावा, त्याला शास्त्रीय बैठक आहे का नाही हे वैज्ञानिक निकष लावून पाहिले जावे आणि त्यासाठी देशात एक संशोधन केंद्र असावे.

त्याउलट फलज्योतिषावर विश्वास ठेवणाऱ्यांची विधाने खालील प्रकारची होती.

१) आधी विश्वास नव्हता पण आयुष्यातील अमक्या प्रसंगी ज्योतिषांनी सांगितलेले खरे ठरले, म्हणून विश्वास बसला.
२) फलज्योतिषाची भाकीते फसतात याचा अर्थ विषय चुकीचा नसून तो फसवेगिरी करणाऱ्यांच्या हाती गेला आहे.
३) पत्रिका न पाहून केलेली लग्ने बरीचशी अयशस्वी ठरली, म्हणून पत्रिका पहावी.
४) शास्त्रज्ञ फलज्योतिषाचा अभ्यास न करताच त्यावर टीकास्त्र सोडतात.
५) एक विधान असेही होते की हॉएल- विक्रमसिंहा यांच्या वैज्ञानिक सिद्धांतानुसार रोगजन्तू धूमकेतूंच्या शेपटीतून पृथ्वीवर येतात, तर हे पूर्वापार चालत आलेल्या धूमकेतूंबद्दलच्या भीतीशी सुसंगत नव्हे का?

माझ्या पुस्तकातील ('आकाशाशी जडले नातं') पन्नासाव्या प्रकरणाचा उल्लेख काही पत्रलेखकांनी केला आहे. त्यातील काही मुद्दे थोडक्यात मांडावेसे वाटतात... किंचित् वेगळ्या शब्दांत मांडतो.

◆ 'वेदिक ॲस्ट्रॉलॉजी' असा उल्लेख यू.जी.सी.च्या पत्रकामुळे बराच प्रचारात आहे. वेदांत भविष्यात शुभ-अशुभ सूचित करणाऱ्या काही घटनांचा उल्लेख आहे, पण पत्रिका, ग्रह वगैरेंचा नाही. वास्तविक आज 'भारतीय फलज्योतिष' म्हणून आपण गर्वाने सांगतो ते मुळात आपले आहे का याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.ते ग्रीकांकडून आपण घेतले असे काही तज्ज्ञांचे मत आहे.

◆ सर्वच शास्त्रज्ञ टीकाकारांनी फलज्योतिषाची माहिती घेतलेली नसते. पण काहींनी निश्चित घेतली-मीही त्यावर काही

पुस्तके वाचलीत. परंतु मादक पदार्थांच्या सेवनावर टीका करणाऱ्यांने त्यांचे सेवन स्वत: करून मगच टीका करावी असे म्हणणे योग्य आहे का? फलज्योतिषाची वैज्ञानिक तपासणी पाश्चात्य देशात अनेक प्रयोगांद्वारे केली गेली आहे.त्यांचा तपशील संशोधन नियतकालिकात व पुस्तकात पहायला मिळतो. वैज्ञानिक प्रयोग योग्य निर्बंध आणि शिस्त पाळून केले की त्यांची वर्णने वाचून इतर वैज्ञानिक स्वत:चे मत बनवतात. त्यासाठी त्यांना स्वत: ते प्रयोग करायची गरज भासत नाही. अशा प्रयोगांनी फलज्योतिषातला फोलपणा उघड्यावर आणला आहे. तेव्हा फलज्योतिषाचा अभ्यास व तपासणी करूनच त्याचे अशास्त्रीयत्व सिद्ध झाले आहे. अर्थात् असे प्रयोग भारतीय पार्श्वभूमीवर होणे गरजेचे आहे हे मीही कबूल करेन.

◆ एखादा विषय विज्ञानात बसतो का हे त्याची गृहीतके आणि तर्कपद्धती पाहून ही ठरवता येते. त्यात वास्तविक तथ्य हे महत्त्वाचे. तथ्यात भर पडते तेव्हा विज्ञानाने आपली गृहीतके बदलली किंवा अधिक व्यापक केलेली आहेत. अणूरेणूंना न्यूटनचे गतीचे नियम लागू पडत नाहीत हे प्रयोगांनी दिसून आल्यावर अतिसूक्ष्म वस्तूंचा अभ्यास करायला पुंजवाद (क्वांटम सिद्धांत) अस्तित्वात आला. फलज्योतिषी अद्याप नवग्रहांना चिकटून आहेत, जरी त्यातील चार 'ग्रह' नाहीत. अंतराळ तंत्रज्ञानाने ग्रहांचे जवळून निरीक्षण करून (मंगळावर यानेही उतरली) जी अफाट माहिती गेल्या पन्नास वर्षांत मिळवली तिचा फलज्योतिषांनी काही तरी उपयोग केला आहे का?

◆ एखादा भविष्यकथनाचा अनुभव बरोबर ठरला तर त्यामुळे फलज्योतिषावर विश्वास ठेवताना खालील बाबींचा विचार करावा. नाणेफेक जिंकणारा कर्णधार एका यशावरून आपण नेहमी बरोबर भाकीत करतो असे म्हणेल का? भविष्य खरे ठरले म्हणजे नेमके काय झाले होते?. मोघम बोललेले 'खरे झाले' असे म्हणण्याला विज्ञानाच्या दरबारी किंमत नाही. नीट अभ्यास करून परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्याला 'तुझे ग्रह उच्चीचे आहेत, यश मिळेल' असे सांगणे सोपे आहे... बारावी सायन्समध्ये पी.सी.एम.ला एक दशांशापर्यंत मार्कांची टक्केवारी सांगता आली पाहिजे. 'तुम्हाला घटस्फोटाच्या मागे लागण्याची गरज नाही' असे सांगणाऱ्या ज्योतिषांने त्या महिलेला 'तुमच्या पतीचे पुढल्या अमुक महिन्यांत निधन होणार' असे का नाही सांगितले?

◆ 'ग्रहांचे परिणाम मानवांवर होतात पण ती शक्ती अजून विज्ञानाला माहीत नाही, म्हणून अशी शक्ती नाहीच' हे म्हणणे बरोबर आहे का? कुठल्याही नैसर्गिक घटनेचे वा नव्या प्रयोगाचे कार्यकारण संबंध शोधायला विज्ञानाला वेळ लागतो. १८२६ साली फ्रॉनहॉफरला सूर्याच्या वर्णपटात काळ्या रेषा सापडल्या. त्यांची कारण मीमांसा एक शतकानंतर करता आली. पण तोपर्यंत त्या रेषांच्या अस्तित्वावर वैज्ञानिकांनी अविश्वास दाखवला का? नाही. उलट अनेक प्रयोगांनी अशा अनेक रेषांची नोंद केली गेली आणि कारण माहीत नसले तरी अशा रेषा उमटतात याची खात्री करून घेतली. तशी खात्री फलज्योतिषाच्या विधानाबाबत 'ग्रहांचे परिणाम मानवांवर होतात' यावर होत नाही कारण तसे विधान तपासून सिद्ध करण्याचे प्रयोग आजवर फसले आहेत.

ही वरील विधाने (१-५) केवळ मी केली म्हणून बरोबर आहेत असे नाही. फलज्योतिषावर विश्वास ठेवणाऱ्यांनी त्यांचा अधिक अभ्यास करावा आणि मग आपले मत बनवावे असे माझे त्यांना नम्र आवाहन आहे. उदाहरणार्थ जर एखाद्या ज्योतिषाकडे स्वत:चे भविष्य विचारायला गेलात तर ते स्पष्ट भाषेत वदवून घ्या. 'धोका संभवतो.' 'मित्रांपासून सावध रहा', 'धनलाभ होण्याची शक्यता आहे' वगैरे गुळगुळीत विधाने मान्य करू नका. तसेच कोणा ज्योतिषाने एकंदर किती भाकीते स्पष्ट शब्दात केली, व त्यापैकी किती टक्के खरी ठरली ही माहिती उपलब्ध असणे जरूरी आहे. केवळ एका दोघांच्या वैयक्तिक किंवा ऐकीव अनुभवावर जाऊ नका.

जाता जाता हॉएल-विक्रम सिंहा सिद्धांताबद्दलच्या विधानाची दखल घेतो. धूमकेतूंना पूर्वापार संस्कृतीतून अशुभ सूचक मानले जाते. त्यामुळे पृथ्वीवर उत्पात (भूकंप, ज्वालामुखी, पूर आदी) होतात, समाजातील ज्येष्ठ व्यक्ती मरतात, रोगराई पसरते आदी मानले जाते. पैकी 'रोगराई पसरते' हे विधान सोडल्यास बाकीच्या गोष्टींचा धूमकेतूंशी काहीही संबंध आढळला नाही. रोगराईबद्दल हॉएल आणि विक्रमसिंहा यांचा सिद्धांत असा. रोगजंतू (व्हायरस) व जीवाणू (बॅक्टेरिया), आकाशगंगेत इतरत्र निर्माण झालेले तेथून धूमकेतूवर गोठलेल्या अवस्थेत स्वार होऊन येतात. जर धूमकेतू सूर्याजवळ आला तर त्याचा काही भाग बाष्पीभूत होऊन लांब शेपूट तयार होते. ती शेपूट जर पृथ्वीला घासून गेली तर त्यावरचे काही कण पृथ्वीच्या वायुमंडलात उतरतात. काहींना आपण उल्का म्हणून पाहतो. तसेच जीवाणू व रोगजंतू पण वायुमंडलात शिरतात व पुढे मागे पृथ्वीवर उतरतात. याला काही महिन्यांचा अवधी लागतो. पृथ्वीवरील काही रोगांच्या साथी (प्लेग, फ्लू आदी) ह्या मार्गे पसरल्या असे त्या दोघांचे मत आहे. अजून ह्या सिद्धांताची छाननी चालू आहे.जर तो मान्य झाला तर धूमकेतूंचा संबंध शास्त्रीय चौकटीत रोगांच्या साथीशी जोडता येईल. पण त्यामुळे 'ग्रहांचा परिणाम मानव जीवनावर होतो' ह्या फलज्योतिषी कल्पनेला समर्थन प्राप्त होत नाही.'

जयंत नारळीकर,
पुणे.